महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नाशिक

(गृह शाखा)

फोन नं. 0253-2319006 ई मेल – gruhshakha@gmail.com

वाचले :-1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील आदेश No.DMU/2020 /CR-92/Dism-1, दि.30/05/2020.
2. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील आदेश No.DMU/2020 /CR-92/Dism-1, दि.29/06/2020 व दि. 06/07/2020.
3. महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.कोचिन-2020/प्र.क्र.37/सां.का.1,दिनांक 30/05/2020.
4. महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.कोचिन-2020/ प्र.क्र.37/सां.का.1,दिनांक 23/06/2020.
5. उपविभागीय अधिकारी निफाड यांचेकडील पत्र क्र.फौजदारी-1/कावि/701/2020, दि.07/07/2020
6. मा.सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नाशिक यांचेकडील पत्र क्र.एमएजी/कावि-210/2020, दि.08/07/2020
7. श्री.अमित रत्नाकर कुलकर्णी, लाईन प्रोड्युसर, एकदंत फिल्म्स, नाशिक यांचा दि.06/07/2020 रोजीचा अर्ज.
8. अर्जदार श्री.अमित रत्नाकर कुलकर्णी, लाईन प्रोड्युसर, एकदंत फिल्म्स, नाशिक यांचे हमीपत्र.
9. वनपरिक्षेत्र अधिकारी सिन्नर (प्रादेशिक) यांचेकडील पत्र जा. क्र.सर्व्हे 396, सन 2020-21

क्र.कक्ष-1/पिओएल - 1/2198/2020 दिनांक :- 09/07/2020

## आदेश

ज्याअर्थी, वाचले क्र. 3 अन्वये महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचेकडील शासन निर्णयान्वये कोविड - 19 च्या पार्श्वभूमीवर चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका / OTT यांच्या चित्रिकरण कामांसंदर्भात सदर शासन निर्णयासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट-अ (Annexure - A) मधील मार्गदर्शक तत्वांच्या अधीन राहून सदर कामे नियंत्रित स्वरुपात सुरू करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच सर्व संबंधितांनी त्यांची कामे कोविड - 19 संदर्भातील कोणत्याही निर्बंधांचा भंग होणार नाही अशा पद्धतीने करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी, वाचले क्र. 7 अन्वये अर्जदार श्री.अमित रत्नाकर कुलकर्णी, लाईन प्रोड्युसर, एकदंत फिल्म्स, नाशिक यांनी नाशिक जिल्ह्यात **फायर फ्लाय प्रोडक्शन्स निर्मित झी ओरिजनल सिरीज अभय सिजन – 2 चे चित्रिकरण** करणेकरीता परवानगी मिळणेबाबत अर्ज इकडील कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अर्जात नमूद चित्रिकरणाची ठिकाणे ही **सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नाशिक व उपविभागीय अधिकारी, निफाड** यांचे कार्यक्षेत्रातील असल्याने संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेकडून अर्जात नमुद केलेल्या ठिकाणी चित्रिकरण करणेस परवानगी द्यावी अगर कसे याबाबत स्वयंस्पष्ट अहवाल मागविणेत आलेला आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त वाचले क्रमांक 5 अन्वये उपविभागीय अधिकारी, निफाड यांनी अर्जदार यांचे अर्जात नमुद केलेल्या मौजे घोरवड ता.सिन्नर येथील घोरवड घाट व जंगल परिसर येथे चित्रिकरण करणेकरीता पोलीस विभागामार्फत आवश्यक तो पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन घेवून तसेच वन विभागाची नाहरकत घेवून अर्जदार यांना चित्रिकरणास परवानगी देण्याबाबत अभिप्राय सादर केलेला आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त वाचले क्रमांक 6 अन्वये सहा.जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी नाशिक यांनी अर्जदार यांचे अर्जात नमुद केलेल्या भगूर-पांढुर्ली रोडवरील नदीचा पुल, मेहेर व्हिला (धोंडीरोड), अल्ताफ हाऊस (गुरुव्दारा रोड) व गोल्ड कॉईन रो-बंगला, एअर इंडीया गेस्ट हाऊस (धोंडीरोड) येथे चित्रिकरण करणेकरीता अर्जदार यांना परवानगी देणेस हरकत नसलेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

त्याअर्थी, अर्जदार यांना सिन्नर तालुक्यातील मौजे घोरवड ता.सिन्नर येथील घोरवड घाट व जंगल परिसर येथे व नाशिक तालुक्यातील मेहेर व्हिला (धोंडीरोड), अल्ताफ हाऊस (गुरुव्दारा रोड) व गोल्ड कॉईन रो-बंगला, एअर इंडीया गेस्ट हाऊस (धोंडीरोड), भगूर-पांढुर्ली रोडवरील नदीचा पुल या ठिकाणी दि.14/07/2020 ते दि.19/07/2020 या कालावधीत **चित्रिकरण करणेस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देणेत येत आहे.**

Scanned with CamScanner

अटी व शर्ती :-

1) महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचेकडील उपरोक्त वाचले क्र. 3 व 4 वर नमुद असलेल्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या "परिशिष्ट - अ" मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे अर्जदार व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहिल तसेच सदर तरतूदींचे उल्लंघन होणार नाही याची अर्जदार व सर्व संबंधितांनी सर्वतोपरी दक्षता घ्यावी.

2) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील उपरोक्त वाचले क्र. 1 व 2 वर नमुद असलेल्या आदेशातील तरतुदी / बाबी अर्जदार व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहतील.

3) चित्रिकरण करावयाचे नियोजित ठिकाण हे कन्टेनमेंट झोनमध्ये तसेच प्रतिबंधित क्षेत्रामध्ये येत नसलेबाबत अर्जदार यांनी चित्रिकरण सुरू करणेपूर्वी त्यांचे स्तरावरून व्यक्तिश: खातरजमा करावी व तदनंतरच चित्रिकरणास सुरूवात करावी.

4) फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अंतर्गत मा. पोलीस आयुक्त, नाशिक शहर व मा. जिल्हादंडाधिकारी, नाशिक यांनी वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांचे पालन करणे सर्व संबंधितांवर बंधनकारक राहिल.

5) चित्रिकरण ज्या ठिकाणी करण्यात येणार आहे त्या संबंधित जागेच्या / ठिकाणाच्या मालकाचे संमतिपत्र / नाहरकत दाखला प्राप्त करुन घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहिल.

6) वनपरिक्षेत्र अधिकारी सिन्नर (प्रादेशिक) यांचेकडील अपरोक्त वाचले क्र.9 वर नमूद असलेल्या पत्रातील अटी-शर्तींचे पालन करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहिल.

7) चित्रिकरण सुरु करणेपूर्वी चित्रिकरणाशी संबंधित असलेले सर्व कलाकार व इतर सर्व संबंधित व्यक्ती यांनी कोविड -19 संदर्भातील वैद्यकिय तपासणी करून घेणे बंधनकारक राहील. तसेच चित्रिकरण पथकातील सर्वांनी आरोग्य सेतु ॲपचा वापर करणे बंधनकारक राहिल.

8) चित्रिकरणाच्या ठिकाणी गर्दी होणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी तसेच सामाजिक अंतराचे पालन करण्यात यावे.

9) चित्रिकरणाची दृश्य वगळता मास्क वापरणे अनिवार्य राहिल व नियोजित ठिकाणी स्थळ चित्रिकरण करतांना हॅण्ड सॅनेटायझरचा वापर वेळोवेळी करणेत यावा.

10) चित्रिकरणाशी संबंधित असलेल्या सर्व व्यक्ती यांनी प्रवास करणेकरीता सक्षम अधिकारी यांचेकडून परवाना (पास) घेणे बंधनकारक असेल.

11) अर्जदार यांनी पोलीस बंदोबस्तासंदर्भात प्रचलित नियमांप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी. तसेच चित्रिकरणादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

12) शासनामार्फत चित्रिकरणासंदर्भात वेळोवेळी निर्गमित करणेत येणारे आदेश / शासन निर्णय हे अर्जदार व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहतील.

13) चित्रिकरणास प्रत्यक्ष सुरूवात करणेपूर्वी अर्जदार यांनी सादर केलेल्या हमीपत्राच्या अनुषंगाने आवश्यक अशा प्रत्येक मुद्याची पूर्तता करूनच चित्रिकरणास सुरूवात करणे बंधनकारक राहील.

14) सदर परवानगी आदेशातील अटीं व शर्तींचा भंग झाल्यास सदर परवानगी रद्द करून प्रचलित नियमानुसार कारवाई केली जाईल याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

सहपत्र :- 1) वाचले क्रमांक 1 व 2 वर नमुद केलेले आदेश.
2) वाचले क्रमांक 3 व 4 वर नमुद केलेले शासन निर्णय.
3) वाचले क्रमांक 9 वर नमूद असलेले पत्र.

स्थळ प्रतिवर मा.जिल्हादंडाधिकारी यांची स्वाक्षरी असे

अपर जिल्हादंडाधिकारी नाशिक

(भागवत डोईफोडे)
अपर जिल्हादंडाधिकारी नाशिक

प्रत :- 1) मा.पोलीस आयुक्त नाशिक शहर नाशिक यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.
2) पोलीस अधिक्षक, नाशिक (ग्रामिण) यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.
3) उपविभागीय अधिकारी नाशिक / निफाड यांना उचित कार्यवाहीसाठी रवाना.
4) तहसिलदार नाशिक / सिन्नर यांना उचित कार्यवाहीसाठी रवाना.
5) अर्जदार श्री.अमित रत्नाकर कुलकर्णी, नाशिक यांना माहितीस्तव रवाना.

Scanned with CamScanner